**आदेश**

क्र.कावि/कक्ष7:2/प्रअभूसं/न.क्र.102/कावि-/ 1058 /2020
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक- 20 / 05 / 2020

विषय :- भूसंपादन प्रकरण क्रमांक १६/२००८-०९ मौज भोटा (बुडीत क्षेत्र) ता.नांदुरा मध्ये प्रारुप निवाडयास ६ महिन्याची मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ:- उपजिल्हाधिकारी,भूसंपादन(मध्यम प्रकल्प )बुलडाणा यांचे पत्रक्र. कावि/उपभूसं/म.प्र./अका/ ८५/२०२०. दिनांक ०८-०५-२०२०

*****

ज्या अर्थी उपजिल्हाधिकारी,भूसंपादन(मध्यम प्रकल्प )बुलडाणा यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रानुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक १६/२००८-०९ मौजे भोटा (बुडीत क्षेत्र) ता.नांदुरा मध्ये प्रारूप निवाडयास ६ महिन्याची मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रकरणात या कार्यालयाचे आदेश दिनांक ०६-११-२०१९ नुसार सहा महिन्याची मुदत वाढ देण्यात आली आहे.

परंतु सदर प्रकरणात कार्यकारी अभियंता जिगांव प्रकल्प, पुनर्वसन विभाग खामगांव यांनी त्यांचे पत्र दिनांक २३-०३-२०२० नुसार या प्रकरणात अदयापपर्यन्त आवश्यक निधी प्राप्त झालेला नाही त्यामुळे सहा महिन्यांची मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे. व त्या अनुषंगानेच उपजिल्हाधिकारी भूसंपादन मध्यम प्रकल्प बुलडाणा यांचेकडून मुदतवाढीचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

ज्याअर्थी भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम २५ मध्ये जिल्हाधिकारी,कलम १९ अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून बारा महिन्याच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल.

परंतु, त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय,लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल.अशी तरतूद आहे.

तरी या तरतुदीनुसार भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे नियम २५ नुसार भुसंपादन प्रकरण क्र. १६/२००८-०९ मौजे भोटा (बुडीत क्षेत्र) ता.नांदुरा जि.बुलडाणा या प्रकरणात प्रारुपनिवाडा करण्यास पुनश्च सहा (६) महिन्यांची (दिनांक २०-११-२०२० पावेतो) मुदतवाढ देण्यांत येत आहे.

(सुमन चंद्रा भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी बुलडाणा